# राज्यातील महामंडळाचे महिन्याभरात वाटप

## देवेंद्र फडणवीसांकडून महत्त्वाची सूचना, महायुतीत कोणाच्या वाट्याला किती जागा?

प्रारंभ । वृत्तसेवा

राज्यातील महायुती सरकारकडून लवकरच बहुप्रतिक्षीत महामंडळ वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून महायुतीमधील अनेक नेते आणि पदाधिकारी हे महामंडळांच्या वाटपाकडे डोळे लावून बसले आहेत. अखेर महामंडळांचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आणि मित्रपक्षांच्या नेत्यांना महामंडळांचे जागावाटप लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सध्या महायुतीचे नेते आणि पदाधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या महिनाभरात राज्यातील महामंडळाचे जागावाटप पूर्ण होईल. महामंडळ वाटपाचा महायुतीचा फॉर्म्युला ठरला आहे. त्यानुसार, भाजपा ४८ टक्के, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २० टक्के महामंडळ, असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. मात्र, कोणत्या पक्षाला कोणते महामंडळ मिळणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. येत्या महिनाभरात यावर शिक्कामोर्तब होईल. महायुतीच्या पुढील बैठकीत महामंडळातील सदस्य वाटप होईल, असे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत महामंडळ वाटपाच्या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होईल. यानंतर तिन्ही पक्षांचे नेते कोणत्या महामंडळावर कोणाची वर्णी लावायची हा निर्णय घेतील. त्यासाठी महायुतीचे अनेक नेते आणि पदाधिकारी देव पाण्यात बुडवून बसले आहेत. त्यामुळे आगामी काळात राज्यातील महत्त्वाच्या महामंडळाची सूत्रे कोणत्या नेत्यांकडे जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

सध्या राज्यात विधानपरिषद निवडणुकीसंदर्भात राजकीय हालचाली सुरु आहेत. विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १६ जागांवर निवडणूक होणार आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण १७ जागांवर निवडणूक होणार, ज्यातील एका ठिकाणी पोटनिवडणूक होणार आहे. त्यादृष्टीने विधान परिषदेच्या किती आणि कोणत्या जागा कोण लढवणार, याबाबत सध्या महायुतीत बोलणी सुरु आहेत. ही निवडणूक बिनविरोध झाल्यास १८ जून रोजी सगळी धामधूम संपेल. मतदान झाल्यास २२ जूनपर्यंत राजकीय डाव-प्रतिडाव आणि चुरस पाहायला मिळेल. त्यानंतर महामंडळ वाटपाच्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी महायुतीचे नेते आणि कार्यकर्त्यांकडून आतापासून महामंडळांवर आपली वर्णी लावून घेण्यासाठी मोर्चेबांधणी सुरु होईल. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये या राजकीय घडामोडींकडे पाहणे औत्स्युकाचे ठरेल.







।। श्री दत्त कृपा ।।

सायं.दैंनिक बीड **प्रारंभ**

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे








बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक ८२ ■ बुधवार, दि. २० मे २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu-82 ■ Wednesday, 20 May -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


# राज्यात महिनाभराचा इंधनसाठा

## पेट्रोल-डिझेल टंचाईवर छगन भुजबळ यांचा दावा

प्रारंभ । वृत्तसेवा

मुंबई: अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे राज्यातील काही भागांमध्ये पेट्रोल, डिझेलसाठी पंपांच्या बाहेर लांब रांगा लागत असताना, राज्यात महिनाभर पुरेल इतका इंधनसाठा आहे, असा दावा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. राज्यातील काही पेट्रोलपंपांवर इंधनाचा पुरवठा पोहोचण्यास वेळ लागत असेल. पण, पेट्रोल, डिझेल मिळतच नाही, अशी तक्रार अद्याप आली नाही. जर तक्रार आली तर त्यावर कारवाई करण्यात येईल.पेट्रोल, डिझेलची कमतरता हा जागतिक परिणाम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आपण आभार मानायला हवेत. कारण या अगोदर २७ देशांकडून आपण कच्चे तेल घेत होतो, पण आता अधिक देशांकडून कच्चे तेल आणि इतर गोष्टी घेतल्या जात आहेत, असेही भुजबळ म्हणाले.



दरम्यान, धान आणि मका उत्पादक शेतकऱ्यांचे चुकाऱ्यापोटीचे ३ हजार २१४ कोटींची थकबाकी तातडीने द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्यामुळे अखेरीस हा प्रश्न मार्गी लागला.

भुजबळ म्हणाले, धान आणि मका विक्रीचे हजारो कोटी रुपये अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. यामुळे राज्यभरातील आमदारांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. शेतकऱ्यांना आधी पैसे द्यायचे आणि नंतर केंद्र सरकारकडून ती रक्कम परत मिळवायची, असे धोरण आहे. पण फाईल्स एका टेबलवरून दुसऱ्यावर फिरत होती. मुख्यमंत्री फडणवीस यांना आपण याबाबत माहिती दिली असता, फडणवीस यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना फोन करत प्रकरण मार्गी लावण्याचे आदेश दिले, अशी माहिती मंत्री भुजबळ यांनी दिली.

# DeepEye Ai आधारित प्रकल्प

# बीड पोलीसांचा डिजिटल तपासातील क्रांतिकारी उपक्रम




## हा प्रकल्प पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून साकारला

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड पोलीस दलाच्या वतीने गुन्हे तपास प्रक्रियेला अधिक वेगवान, अचूक, पारदर्शक व परिणामकारक बनवण्यासाठी DeepEye ही कृत्रिम बुद्धिमत्ता (Ai) आधारित अत्याधुनिक प्रणाली विकसित करण्यात आली असून, हा प्रकल्प मा. पोलीस अधीक्षक बीड श्री. नवनीत कावत यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून साकारला आहे. सदर प्रणालीची अंमलबजावणी बीड शहर पोलीस ठाण्यात पायलट प्रकल्प म्हणून सुरू होत असून, हा पायलट प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर ही प्रणाली संपूर्ण महाराष्ट्र स्तरावर राबविण्यात येऊ शकते. DeepEye ही प्रणाली एफआयआर नोंदणीपासून ते आरोपपत्र सादर होईपर्यंत संपूर्ण तपास प्रक्रिया डिजिटल व एकात्मिक पद्धतीने हाताळणारी सक्षम प्रणाली असून, सध्या वापरात असलेल्या ३० पेक्षा अधिक भौतिक रजिस्टरच्या ऐवजी सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देते. ही प्रणाली व या दोन्ही प्लॅटफॉर्मवर मोबाइल ॲप स्वरूपात उपलब्ध असून, त्यासोबतच DeepEye चे अधिकृत वेबसाईट प्लॅटफॉर्म देखील विकसित करण्यात आले आहे.

या प्रणालीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने एफआयआरचे स्वयंचलित विश्लेषण, संबंधित कायद्यांची कलमे सुचविणे, गुन्हे पुनरावृत्ती करणाऱ्या आरोपींची ओळख, तसेच गुन्हेगारी पॅटर्नचे विश्लेषण करण्यात येते. यासोबतच विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अचानक वाढ झाल्यास तात्काळ अलर्ट मिळतात आणि त्या अनुषंगाने प्रणालीकडून प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन दिले जाते, जसे की संवेदनशील

▶▶ पान २ वर...

# आरोपी वाल्मिक कराडला गंभीर आजार

## ३ दिवसांपासून सलाईनवर, कारागृहातच...

बीड । प्रतिनिधी

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपी वाल्मीक कराड हा सध्या बीड जिल्हा कारागृहात आहे. गेल्या तीन दिवसांपासून त्याला लघवीच्या ठिकाणी तीव्र त्रास होत असून, सध्या तो कारागृहातच सलाईनवर आहे. यापूर्वीही वाल्मीक कराडला याच आजारावरील उपचारासाठी बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याला 'युरोसिस्टायटीस' नावाचा गंभीर संसर्ग झाल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, वाल्मीक कराडला पुढील



उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वारती) ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्याच्या हालचाली प्रशासनाकडून सुरू आहेत. येत्या गुरुवारपर्यंत त्याचा त्रास कमी न झाल्यास त्याला तातडीने अंबाजोगाई येथील रुग्णालयात हलवण्यात येईल, अशी माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

# नीट पेपर फुटीचा मास्टरमाईंट पी. व्ही. कुलकर्णीला मोठ झटका

बीड । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात तर खळबळ उडालीच पण लाखो विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांच्या स्वप्नांचा चुराडा झाला. याप्रकरणाचा तपास सुरू असून सीबीआयच्या तपासात अनेक धागेदोर समोर येत आहेत. याच पेपर फुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार अर्थात मास्टरमाईंड पी.व्ही कुलकर्णी याला सीबीआयने पुण्यातून अटक केली होती. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या अतिशय गोपनीय अशा प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीशी कुलकर्णी हा संबंधित




होता, अशी माहिती समोर आली. त्याच्या अटकेने प्रचंड खळबळ माजली.

आता याच पी.व्ही. कुलकर्णीला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. सध्या तुरूंगाच्या गजाआड असलेल्या पी.व्ही कुलकर्णी याचे बीड शहरातील शाहूनगर भागात इमारतीचे बांधकाम सुरू आहे. मात्र त्याचं बांधकाम विनापरवाना असल्याचं

▶▶ पान २ वर...

# दिव्यांगांच्या अडचणी सोडवा खा.सोनवणे यांचे सीएसला पत्र

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घेताना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असून, विशेषत: वऊकऊ कार्डला आधार क्रमांक लिंक नसण्यामुळे अनेक लाभार्थी योजनांपासून वंचित राहत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत बीड लोकसभेचे खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या संदर्भात त्यांनी बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक यांना अधिकृत पत्र पाठवून तातडीने आणि ठोस पावले उचलण्याचे



कडक निर्देश दिले आहेत.

दिव्यांग बांधवांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास ही बाब प्रशासकीय स्तरावर खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही या पत्राद्वारे देण्यात आला आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर आणि दिव्यांग योजनांच्या संथ गतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे त्यांचे हक्क आहे. मात्र, केवळ युडीआयडी कार्ड आणि आधार लिंकिंग न झाल्यामुळे

▶▶ पान २ वर...

### अहवाल सादर करण्याचे आदेश

खा.सोनवणे यांनी केवळ निर्देश देऊन न थांबता, या संपूर्ण प्रकरणावर जिल्हा शल्य चिकित्सकांनी केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल लेखी स्वरूपात तातडीने आपल्या कार्यालयाकडे सादर करावा, असेही पत्राच्या शेवटी निक्षून सांगितले आहे. खा.सोनवणे यांच्या या आक्रमक पावित्र्यामुळे आता बीड जिल्हा रुग्णालय प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली असून, येत्या काही दिवसांत जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# शासन योजनांचा रास्त लाभ देण्यासाठी फार्मर आयडी मधील दोष दूर करावेत-आ.पंडित

## आ. विजयसिंह पंडित यांची कृषी दत्तात्रय भरणे यांच्यासोबत बैठक

मुंबई । प्रतिनिधी

फार्मर आयडीमधील तांत्रिक दोष दूर करून शेतकऱ्यांना शासन योजनांचा लाभ मिळवून देण्यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवरील चर्चे दरम्यान दिलेल्या आश्वासनाप्रमाणे राज्याचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी आज मंत्रालयात याबाबत बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत फार्मर आयडीमधील तांत्रिक दोष दुरुस्त करण्यासंदर्भात आढावा घेऊन चर्चा करण्यात आली. विधानसभेतील चर्चेनंतर या कामी युद्धपातळीवर काम करण्यात आले त्यानंतरही शिल्लक राहिलेल्या फार्मर आयडी मधील दुरुस्त्या पुढील पंधरा दिवसात कराव्यात. महसूल आणि कृषी या दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने



काम करू पोखरा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा असे निर्देश कृषिमंत्री महोदयांनी दिले असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली.

याबाबत माहिती देताना ते पुढे म्हणाले की, फार्मर आयडी

▶▶ पान २ वर...

# सुरुवातीच्या व्यवहारात शेअर बाजारात घसरण, सेन्सेक्स-निफ्टी घसरले

मुंबई : जागतिक पातळीवरील कमकुवत संकेतांमुळे आज सुरुवातीच्या व्यवहारात देशांतर्गत शेअर बाजारावर दबाव आला आहे. व्यवहारांची सुरुवात घसरणीने झाली. बाजार उघडल्यानंतर विक्रीचा दबाव वाढला, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये घसरण सुरूच राहिली.खरेदीदारांनी अधूनमधून खरेदी करून बाजाराला आधार देण्याचा प्रयत्न केला असला तरी, विक्रीचा दबाव इतका तीव्र होता की दोन्ही निर्देशांकांच्या हालचालीत सुधारणा होऊ शकली नाही. सकाळी १० वाजेपर्यंत, सेन्सेक्स १.३६ टक्क्यांनी आणि निफ्टी १.३३ टक्क्यांनी घसरला होता. शेअर बाजारातील दिग्गज कंपन्यांमध्ये, इन्फोसिस, टेक महिंद्रा, भारती एअरटेल, कोल इंडिया आणि विप्रो यांचे शेअर्स ०.९९ टक्के ते ०.१३ टक्क्यांपर्यंतच्या वाढीसह व्यवहार करत होते. दुसरीकडे, टाटा स्टील, पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन, श्रीराम फायनान्स, ट्रेंट लिमिटेड आणि अदानी पोर्ट्स यांचे शेअर्स ४.१३ टक्के ते २.२५ टक्क्यांपर्यंतच्या घसरणीसह व्यवहार करत होते. "आजच्या तारखेनुसार, शेअर बाजारात २,७४४ शेअर्समध्ये सक्रिय व्यवहार सुरू होते. यापैकी ४२५ शेअर्समध्ये वाढ झाली, तर २,३१९ शेअर्समध्ये घट झाली. त्याचप्रमाणे, सेन्सेक्सच्या ३० शेअर्सपैकी सहा शेअर्स खरेदीच्या पाठिंब्यामुळे तेजीत राहिले. दुसरीकडे, विक्रीच्या दबावामुळे २४ शेअर्समध्ये घट झाली. निफ्टीच्या ५० शेअर्सपैकी १२ शेअर्समध्ये वाढ झाली, तर ३८ शेअर्समध्ये घट झाली.

बीएसई सेन्सेक्स आज ४३०.०२ अंकांच्या घसरणीसह ७४,८०७.९७ अंकांवर उघडला. व्यवहार सुरु झाल्यानंतर विक्रीच्या दबावामुळे निर्देशांकातील घसरण वाढतच गेली. तथापि, खरेदीदार वेळोवेळी खरेदीचा दबाव वाढवण्याचा प्रयत्न करत राहिले. असे असूनही, या निर्देशांकाच्या हालचालीवर फारसा परिणाम झाला नाही. सततच्या विक्रीमुळे, सकाळी १० वाजेपर्यंतच्या व्यवहारानंतर सेन्सेक्स १,०२६.०८ अंकांच्या घसरणीसह ७४,२११.९१ अंकांच्या पातळीवर व्यवहार करत होता. सेन्सेक्सप्रमाणेच, एनएसईचा निफ्टीसुद्धा आज १६१.३० अंकांनी घसरून २३,४८२.२० अंकांच्या पातळीवर व्यवहाराला सुरुवात झाली. बाजार उघडल्यानंतर, वाढत्या विक्रीच्या दबावामुळे या निर्देशांकाची कमजोरी वाढतच गेली. सततच्या विक्रीमुळे हा निर्देशांक २३,३१७.१० अंकांच्या पातळीपर्यंत घसरला. बाजारात सततच्या खरेदी-विक्रीनंतर, सकाळी १० वाजेपर्यंतच्या व्यवहारानंतर निफ्टी ३१४.१० अंकांनी घसरून २३,३२९.४० अंकांच्या पातळीवर व्यवहार करत होता. यापूर्वी, मागील आठवड्याच्या शेवटच्या व्यवहार दिवशी, शुक्रवारी, सेन्सेक्स १६०.७३ अंकांच्या म्हणजेच ०.२१ टक्क्यांच्या घसरणीसह ७५,२३७.९९ अंकांच्या पातळीवर बंद झाला होता. तर दुसरीकडे, निफ्टी शुक्रवारी ४६.१० अंकांच्या म्हणजेच ०.१९ टक्क्यांच्या घसरणीसह २३,६४३.५० अंकांच्या पातळीवर बंद झाला होता.

# लोकमित्र राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

बीड प्रतिनिधी - सा. युवा लोकमित्र कडून पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले असून प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख १जून असून पुरस्कार वितरण समारंभ २०जून रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

समाजसेवा, शिक्षण, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय, क्रीडा, पत्रकारिता इत्यादी क्षेत्रांमध्ये विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पत्रकारिता क्षेत्रात आपल्या परखड आणि सडेतोड लेखणी द्वारे आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे सामाहिक युवा लोकमित्र चा वर्धापन दिन येत्या २० जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध क्षेत्रांत निःस्वार्थ व विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना ''लोकमित्र'' राज्यस्तरीय गौरव पुरस्कार - २०२६-२७ वितरीत करून गौरविण्यात येणार आहे.

याविषयी बोलताना संपादक तथा पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष शेख ताहेर,यांनी म्हटले की, समाज आणि राष्ट्राप्रती समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या घटकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हा या पुरस्कारामागील मुख्य हेतू आहे. समाजाच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींना युवा लोकमित्र परिवाराच्या वतीने या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाईल. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १जून २०२६ आहे. या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याकरिता निवड समितीचे पदाधिकारी शेख ताहेर - ९३७०९३७०८१, शेख आयेशा - ९३२२१२९४९१, शेख युनूस - ९८२२५१०२९२, सय्यद इलयास - ९९२२३५५०३१, शेख अब्दुल रहेमान - ९७६३७६९३९५, गुलाम साकीब - ९२२६३६८४९३, हकीम मनीयार - ८३२९५७२६०४,

कलाम सर - ८८५५०४५४४६,

डॉ.शेख नासेर - ९८६०३३९२६४,

शेख वसीम - ९०२८९७९९९१ यांच्याशी संपर्क साधावा किंवा सा. युवा लोकमित्र कार्यालय, बार्शी नाका चौक, बीड. येथे प्रत्यक्ष भेट द्यावी असे आवाहन निवड समितीकडून करण्यात आले आहे.

# बीड शहरातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या त्रासाविरोधात ब्राईट सोशल फाउंडेशनचे निवेदन

बीड प्रतिनिधी

बीड शहरामध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या मोकाट कुत्र्यांच्या त्रासामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून या पार्श्वभूमीवर ब्राईट सोशल फाउंडेशन, बीड यांच्या वतीने नगर परिषद प्रशासनाला इमेल द्वारे निवेदन पाठविण्यात आले. शहरातील मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

ब्राईट सोशल फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड शहरातील मुख्य रस्ते, चौक, शाळा परिसर, बाजारपेठ, गल्ली-बोळ तसेच रहिवासी भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचे टोळके मोठ्या प्रमाणात फिरताना दिसून येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर, सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांवर तसेच रात्री कामावरून घरी परतणाऱ्या लोकांवर मोकाट कुत्रे धावून जात असल्याच्या घटना वाढल्या आहेत. अनेक दुचाकीस्वारांचा कुत्र्यांमुळे तोल जाऊन अपघात झाल्याचे प्रकार समोर आले असून काही नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याने रुग्णालयात उपचार घ्यावे लागले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शहरातील कचरा डेपो, उघड्यावर पडणारा अन्नकचरा तसेच नियंत्रणाच्या अभावामुळे मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत आहे. भविष्यात रेबीजसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

यामध्ये मोकाट कुत्र्यांची पकड मोहीम राबविणे, निर्बिजीकरण व लसीकरण करणे, शाळा व गर्दीच्या भागात विशेष पथके नेमणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा करणे तसेच नागरिकांसाठी विशेष हेल्पलाईन सुरू करणे आदी मागण्यांचा समावेश आहे. शहरातील नागरिकांच्या जीविताशी संबंधित हा गंभीर प्रश्न असून प्रशासनाने तात्काळ कार्यवाही न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही ब्राईट सोशल फाउंडेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

# तेली समाज गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्काराचे आयोजन

बीड प्रतिनिधी : जय संताजी प्रतिष्ठान, जिल्हा बीडच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार समाज भुषण तथा अखिल भारतीय तैलिक साहु महासभा राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री जयदत्तजी (आण्णा) क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १० वी, १२ वी मधील ज्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ७०% पेक्षा जास्त गुण आहेत, अशा विद्यार्थ्यांनी गुणपत्रक झेरॉक्स, पासपोर्ट फोटो व पालकाचा पत्ता, संपर्क क्रमांक देवून आपले नाव नोंदणी करावी. तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, खेळाडू व इतर क्षेत्रात सन २०२५-२६ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पदविका, प्राविण्य प्राप्त केली अशा विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या समाजातील तालुका निहाय व्यक्तिशी संपर्क करून आपल्या नावाची नोंदणी करावी. तालुका निहाय संपर्क प्रमुखांची नावे पुढीलप्रमाणे बीड तालुक्यातील रामेश्वर पवार (जिल्हाध्यक्ष)-९०२८९२६०४४, शिवलिंग क्षीरसागर (कार्याध्यक्ष) -९८६०५५५२४४, उमेश पवार -९७६३६६६२५५, परमेश्वर धारकर-९६५७६६१४५५, मुरलीधर राऊत -९७६७३३५७६७, राधाकिसन पेंढारे-९८६०५१३५८२, देविदास एकशिंगे-९७६४१७७४४०, अरूण राऊत-९४२००३०८२३, महादेव लोमटे-९८६०९२१६९८, प्रशांत महाराज क्षीरसागर-७२१८०९०५४७, गेवराई तालुक्यातील कैलास टोणपे-९८५८२८३३३३, भागवत राऊत-९७६५१०११४१, माजलगाव तालुक्यातील अशोक धारक-९८६०७५३९७५, जगदीश साखरे -९६०४२९८७६१, संतोष वाघमारे-९०७५९३९३९३, वडवणी तालुक्यातील गणेश क्षीरसागर-८८०५५५५३५०, अंकुशराव पेशवे-९८६०५८४०४३, धारूर तालुक्यातील ज्ञानेश्वर शिंदे -९०९६५५९८५५, महारुद्र इंगळे-९४२२६५५०८५, परळी तालुक्यातील मधुकर शिंदे-९९६०७७७३७०, अनिल बेंडे-९८२२६३१७८८, अंबाजोगाई तालुक्यातील रामेश्वर व्यवहारे -७०२०५९६७४६, बाळासाहेब ठमके -९९२२८५५५३१, बाळासाहेब राजमाने-९९२२२२९४७४, केज तालुक्यातील मयुर राऊत-९१५८०१४३२९, पाटोदा तालुक्यातील नवनाथ साळुंके -९९२१०४३००५, सचिन शिंदे-९४२१३३९३०२, शिरूर (कासार) तालुक्यातील दत्ता शिंदे -९८८१४९१०४९, रविंद्र राऊत-९४२३३४८५१०, आष्टी तालुक्यातील अनिल सूर्यवंशी -९४२३७४५३५३. तरी वरील समाजातील व्यक्तींकडे संपर्क करून आपले शैक्षणिक कागदपत्रे देऊन सहकार्य करावे. तसेच पेठ बीड मधील १) विठ्ठला मिनरल वॉटर, वसंत भवन, तेली गल्ली, रविवार पेठ, बीड. २) अंबिका मेडिकल, बसस्थानका समोर, बीड .३) स्वास्तिक सिलेक्शन, सुभाष रोड, बीड ४) केसोना गॅस एजन्सी, शिवाजी नगर, बीड या ठिकाणी संपर्क साधून आपले कागदपत्रे जमा करावे, असे आवाहन जय संताजी प्रतिष्ठान, जिल्हा बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रभु वैद्यनाथाच्या नगरीत श्रीमद भागवत महाकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

परळी वैजनाथ प्रतिनिधी

अधिक मासाच्या पवित्र पर्वानिमित्त प्रभु वैद्यनाथाच्या नगरीत भक्तिमय वातावरणात श्रीमद भागवत महाकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान नगर येथील श्री कृष्ण मंदिर परिसरात हा धार्मिक सोहळा पार पडणार असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भागवत कथेसाठी उत्तरप्रदेश येथील ह.भ.प. सर्वेश शास्त्री नैमिषारण्य धाम हे कथा प्रवक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सुश्राव्य व ओजस्वी वाणीमधून श्रीमद भागवत कथेचे निरूपण होणार असून कथा दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे.

रविवार दि. १७ मे २०२६ रोजी या ज्ञानयज्ञास प्रारंभ झाला असून शनिवार दि. २३ मे २०२६ रोजी सांगता होणार आहे. तसेच सांगता दिनी दुपारी २ ते ५ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे दुसरे पुष्प आहे. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन सौ. रंजना बालासाहेब कुन्हे तसेच किरणजी उपाडे साहेब, अॅड. गिरीश नरवणे साहेब व अजय बालासाहेब कुन्हे यांनी केले असून श्री कृष्ण मंदिर, हनुमान नगर, परळी वैजनाथ जि.बीड येथे होणाऱ्या या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भागवत कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी परीक्षेत नवा विक्रम

. शिरूर कासार तालुक्यातील जांब येथील स्फूर्ती शिक्षण प्रसारक मंडळ जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत उज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल दिनांक ८ मे रोजी जाहीर झाला असून यामध्ये विद्यालयाचा शेकडा ८७.८७ टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत कु. आकांक्षा सचिन खळदकर हिने ९४.४०% टक्के गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवला कु. अनुष्का संदीप खळदकर हिने ९३.८० % टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला तर चि. वेदांत काळूराम राक्षे याने ९३.२०% टक्के गुणांसह विद्यालयातून तृतीय क्रमांक संपादन करत बाजीराव पाटील विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला तसेच कु. कार्तिकी संतोष ताकवणे हिने( ९२.८०%)टक्के कु. सिद्धी सतीश कदम (९१.६०%), चि सुजल अमोल जेधे (९१.६०%) कु.प्रांजल सचिन जाधव (९१.%) कु नूतन गणेश जाधव (८९.२०) कु समृद्धी निलेश जेधे (८९.२०%),चि पृथ्वीराज रामधन करपे (८६.२०%)चि.साई गणेश भोसले (८५.८०) चि. क्षितिज सुनील खेडकर ( ८१.०० )कु. योगिता बळीराम तांबारे (७९.००)चि. सिद्धेश्वर मस्कर (७७.४०),कु रागिनी अशोक सातपुते (७५.८०),चि. सुरज भरत सातपुते (७४.२०),चि. चैतन्य सुंदरराव ढवळे (७४.१०),कु सारिका खेडकर (७२.२०) चि. भगवान बंडू वाघमारे (७१.००) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे या विद्यालयातून विशेष प्राविण्यासह १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये ९ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीमध्ये ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत एकंदरीत विद्यालयातील अनेक विद्यार्थी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशामुळे सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्फूर्ती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.दत्तात्रय आघाव साहेब संस्थेचे सचिव भगवत रावजी आघाव साहेब संस्थेचे मार्गदर्शक डॉ.प्रदीप आघाव विद्यालयाचे मुख्याध्यापक खाडे तुकाराम विद्यालयाचे सहशिक्षक अशोक मोरे सर मिसाळ सर जामकर सर जायभाये सर खेडकर सर कराड सर ढास सर सोनवणे सर मस्के सर मोराळे मॅडम, दहिफळे मॅडम, भांगे सर यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी सरपंच, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# अजिमोद्दिन शेख पद्मपाणि राज्यस्तरीय उत्कृष्ट सामाजिक कार्य २०२६ पुरस्काराने सन्मानित

कडा प्रतिनिधी

२६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या अनुषंगाने पद्मपाणि राष्ट्रीय- राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अजिमोद्दिन शेख यांना पद्मपाणि उत्कृष्ट सामाजिक कार्य २०२६ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमात पोलिस निरीक्षक पल्लवी जाधव , पोलीस निरीक्षक सुभाष सानप(नाशिक) यांच्या हस्ते सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अनेक व विविध प्रकारे आंदोलने, उपोषणे, माहिती अधिकार,निवेदने आणि जन आंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत भ्रष्टाचाराविरोधातही त्यांनी आवाज उठवला आणि भ्रष्ट कामात कारवाही करण्यात यश मिळवले त्यांच्या या धाडसी कार्याची समाजसेवेची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पद्मपाणि हा मानाचा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल अजिमोद्दिन शेख यांनी संस्थापक अध्यक्ष दिलीप तरकसे व त्यांच्या पुर्ण टिमचे आभार मानले. पुरस्कार स्वीकारताना शेख यांच्यासोबत त्यांची पत्नी खातून शेख,शेतकरी संघटनेचे रामप्रसाद गाडे,रघूनाथ नावडे,संजय खटके ,प्रा.राम बोडखे,प्रा.हेमाली बोडखे,पत्रकार रहेमान सय्यद यांची उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल विविध स्तरांतील शुभचिंतकांकडून अजिमोद्दिन शेख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देशहितासाठी जीवनशैलीत बदल गरजेचा;श्री बंकटस्वामी महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम संपन्न

बीड प्रतिनिधी

१५ मे २०२६ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहतुकीचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे टाळणे तसेच जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे यांनी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता देशाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी विशेषतः कर्मचाऱ्यांना आवाहन केले की, महाविद्यालयाकडे येताना ज्यांच्याकडे सायकल उपलब्ध आहे त्यांनी सायकलीचा वापर करावा. तसेच स्वदेशी वस्तूंच्या खरेदीकडे आपला अधिक कल असावा. यासोबतच किमान आठवड्यातून दोन वेळा तरी महाविद्यालयात येताना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा किंवा जवळ राहणारे दोन कर्मचारी असल्यास बाईक शेअरिंग ( ) पद्धतीचा अवलंब करावा, असेही त्यांनी सुचविले. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना () विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. अरुण दैतकार तसेच राष्ट्रीय छात्र सेना () विभागाचे प्रमुख डॉ. जगन्नाथ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही उपस्थितांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे, इंधन बचतीवर भर देणे, पर्यावरण संवर्धनासाठी व देश हितासाठी यासारख्या संकल्पनांना प्रोत्साहन देणे आणि स्वदेशी वस्तूंचा अधिकाधिक वापर करण्याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापिका वर्षाताई भोसले, डॉ.जयद्रथ मगर, डॉ.राम आवारे, प्रा. रणजित आखाडे, प्रा.रमेश बळवी, श्री प्रशांत कोल्हे, श्री गाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयात विविध जनजागृती उपक्रम, चर्चासत्रे व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षक प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे

सायं.दैनिक बीड
# प्रारंभ
बुधवार, दि. २० मे २०२६






# यमगरवाडी जोड रस्त्यासाठी १३७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर - आ. पंडित

## आश्वासनपूर्तीमुळे ग्रामस्थांकडून आ. पंडित यांचे आभार



गेवराई २० मे (प्रतिनिधी) : प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमधून गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे यमगरवाडी जोड रस्त्याच्या डांबरी नूतनीकरण कामासाठी १३७.२९ लक्ष रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. विधानसभा निवडणुकीतील प्रचारादरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यमगरवाडी ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती या माध्यमातून झाली असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या कामाच्या मंजुरीबाबत त्यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महायुती सरकारचे जाहीर आभार व्यक्त केले आहेत तर यमगरवाडी ग्रामस्थांनी आश्वासनपूर्तीबद्दल आ. विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहेत.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यातील सन २०२६ - २७ मधील महाराष्ट्र राज्यातील कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश १८ मे रोजी निर्गमित झाले. या मध्ये बीड जिल्ह्यातून केवळ प्रजिमा २० ते यमगरवाडी या जोड रस्त्याच्या एकमेव कामाचा समावेश आहे. प्रजिमा २० ते यमगरवाडी या रस्त्याच्या डांबरी नूतनीकरण कामाला १३७.२९ लक्ष रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मौजे यमगरवाडी ग्रामस्थांनी आमदार विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहेत.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे यमगरवाडी या जोड रस्त्याचे डांबरीकरण आणि रस्त्यावरील पुलांची कामे करून देण्याचे आश्वासन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. या रस्त्याच्या कामाच्या मंजुरीमुळे हे आश्वासन पूर्ण होत असल्याचे समाधान होत असुन निवडणूक ▶▶ पान २ वर...

# खा.सोनवणे यांच्या प्रयत्नामुळे यमगरवाडीला मिळला रस्ता

### प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत निधी मंजूर; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण



बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा आणि दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. तालुकयातील एमडीआर-२० ते यमगरवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४' अंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. या रस्त्यासाठी १ कोटी ३७ लक्ष २९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने (नवी दिल्ली) १८ मे २०२६ रोजी या कामाला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे परिसरातील ग्रामस्थांची अनेक वर्षांची मोठी अडचण दूर होणार आहे. गेवराई तालुक्यातील एमडीआर-२० ते यमगरवाडी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत ▶▶ पान २ वर...

# श्री क्षेत्र पंढरपुरात २४ मे पासून संगीतमय श्रीमद् भागवत महापुराण कथेचे आयोजन



पंढरपूर । प्रतिनिधी

अधिकमासाचे पावन पर्व साधून श्री क्षेत्र पंढरपूर येथील गोदावरी धाम, नाना महाराज ढेकणमोहकर यांच्या मठात भव्य 'संगीतमय श्रीमद्? भागवत महापुराण कथा' ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक २४ मे २०२६ ते गुरुवार, दिनांक २८ मे २०२६ या कालावधीत ही कथा संपन्न होणार आहे.

या कथेचे निरूपण प्रसिद्ध कथा प्रवक्ते, श्री राधेशाम कृपांकित भागवताचार्य श्री सचिनजी महाराज सपकाळ (बीड) यांच्या सुश्राव्य वाणीतून होणार आहे. कथेला उत्कृष्ट संगीतसाथ लाभणार असून, सिंथ व गायनसाथ ह.भ.प. वसुदेव महाराज काजळे आणि ह.भ.प. कुसुमताई सपकाळ करणार आहेत. तसेच तबलासाथ ह.भ.प. हरी महाराज भोसले यांची लाभणार आहे. या कथेची वेळ दररोज सकाळी १०:०० ते दुपारी ०१:०० वाजेपर्यंत असणार आहे. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन सौ. आशाताई गलांडे आणि श्रीमती शांताताई होनराव संपर्क ८९९९५ ३९२६० / ७७९६११३८६७ यांनी केले आहे. या पाच दिवसीय ज्ञानयज्ञाचा आणि हरिभक्तीचा लाभ सर्व भाविक व पंढरीतील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'सुशी'वडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा ; शेतकऱ्याचा मुलगा झाला पोलीस

## संभाजी मुळक याची मुंबई पोलीसपदी निवड, ग्रामस्थांकडून सत्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील सुशी (व) येथील भूमिपुत्र संभाजी शिवाजी मुळक याची नुकत्याच झालेल्या पोलिस भरतीत मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. विशेष म्हणजे तो गावातील पहिला पोलीस म्हणून पोलीस दलात भरती झाला आहे. तर शेतकऱ्याचा मुलगा पोलीस झाल्याने सुशी ग्रामस्थांच्या वतीने त्याचा भव्य नागरी सत्कार करुन गावातून उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. एका ग्रामीण भागातील तरुणाने आपल्या कष्टाच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.

शेतकरी कुटुंबातील संभाजी शिवाजी मुळक याने यापूर्वी आर्मी , वनरक्षक, पोलीस भरती यासह विविध खात्यात भरतीसाठी प्रयत्न केले. परंतु शेवटी अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्याच्या जोरावर त्याने यशाला गवसणी घातली आहे. ना कोणत्या अकॅडमीत ना कुठले क्लास त्याने केले होते. फक्त मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सुशी ग्रामस्थांच्या वतीने त्याची गावातून भव्य मिरवणूक काढली. ▶▶ पान २ वर...

### पोलीस दलात वरिष्ठ अधिकारी होवून आई-वडिलांचे स्वप्न साकार करायचे आहे

**लहानपणापासून मनात एकच स्वप्न होते की सर्वसामान्याची सेवा करण्यासाठी आपल्याला मोठा अधिकारी व्हायचं आहे. आई-वडील आणि शिक्षक वृंद यांच्या मार्गदर्शनाने पोलीस दलात भरती झालो आहे. एवढ्यावरच न थांबता पोलीस खात्यातून सर्वसामान्याची सेवा करत भविष्यात पोलीस दलात वरिष्ठ अधिकारी होवून आई-वडिलांचे स्वप्न साकार करायचे आहे.**

**- संभाजी शिवाजी मुळक (पोलीस)**



# मा आ.अमरसिंह पंडीत, आ.विजयसिंह पंडीत विधानसभेला दिलेला शब्द पाळला

गेवराई । प्रतिनिधी

उमापूर ग्रामपंचायत हद्दीतील हिंगेवस्तीत स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर रस्ता पोहोचला आहे. रस्त्याअभावी येथे वाहन पोहोचणे ही जिकिरीचे होते. त्यामुळे गरोदर महिला, ज्येष्ठांचे अधिक हाल होत असत. त्यामुळे येथे दळणवळणाची सोय द्यावी, अशी ३५-४० वर्षांपासून मागणी होती. परंतु त्यानंतरही रस्त्याचे काम होत नव्हते. मात्र विधानसभा निवडणुकीत मा.आ.अमरसिंह पंडीत, आ. विजयसिंह पंडीत यांच्याकडून खरेदी विक्री संघाचे सभापती जयदिप औटी यांनी या वस्तीवरील नागरीकांना शब्द मीळवुन दिला होता. वचनपुर्ती करून मा. आ. अमरसिंह पंडीत, आ. विजयसिंह पंडीत यांनी उमापूर फाटा ते हिंगे वस्ती चा दर्जेदार रस्ता मंजुर करून प्रत्यक्ष कामास काल सुरुवात झाली आहे.



गत अनेक वर्षापासून उमापूर ते पंचाळेश्वर ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरन योजना अंतर्गत सदर काम होणार आहे एकुण सहा किमी चा रस्ता मजबुतीकरण होणार आहे प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे काल माजी आ. अमरसिंह पंडीत यांचे हिंगे वस्ती येथील सुभाष हिंगे, शिवाजी जाधव, नवनाथ बांडे,सर्जेराव हिंगे,प्रशांत जाधव,मदन बांडे,राजेंद्र जाधव,उद्धव बांडे, सुरेश हिंगे, राधाकिसन बांडे,विजय जाधव, बाबासाहेब हिंगे,योगेश कोल्हे,बाळकृष्ण देशमुख यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले.

# धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून युवा नेते जयदत्त भय्या धस यांना भाजपची उमेदवारी द्यावी ॲड. प्रकाशदादा कवठेकर



बीड । प्रतिनिधी

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने युवा नेतृत्वाला संधी देत युवा नेते जयदत्त भय्या धस यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाशदादा कवठेकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात जयदत्त भय्या धस यांच्या उमेदवारीमुळे भाजपला मोठा राजकीय फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

ॲड. कवठेकर म्हणाले की, धाराशिव-लातूर-बीड हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या मतदारसंघामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचे मोठे जाळे असून ग्रामीण भागातील राजकारणावर या निवडणुकीचा मोठा प्रभाव पडत असतो. अशा परिस्थितीत जनसंपर्क, संघटन क्षमता आणि कार्यकर्त्यांशी असलेली नाळ मजबूत असलेला उमेदवार भाजपने मैदानात उतरविणे आवश्यक आहे.

यापूर्वी या मतदारसंघातून लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी प्रभावी नेतृत्व करत विजय संपादन केला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली आष्टी, पाटोदा, शिरूर परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली. नगरपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषद आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे निर्माण केले आहे. बीड ▶▶ पान २ वर...

# पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे सिंदखेड गावातील महिलांची दैना

गेवराई । प्रतिनिधी

मौजे सिंदखेड गावातील परिस्थिती पाण्याविषयी खुप काही सांगुन जाते विहिरी, हातपंप कोरडे पडल्याने सिंदखेड येथील नागरिकांवर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे. आज पंधरा दिवस होऊन गावचा पाण्याचा प्रश्न बंद आहे विशेषतः महिलांना दररोज १ ते २ किलोमीटर पायपीट करून डोक्यावर हंडे भरून पाणी आणावे लागत आहे.

पाणीटंचाई तीव्र गावातील मुख्य विहिरी व हातपंप सद्यस्थितीत कोरडे पडले आहे. यामध्ये महिलांचे हाल पहाटे ४ वाजल्यापासून महिला व लहान मुली दूरच्या शेतातील विहिरीवर रांगा लावत आहेत. एक हंडा पाण्यासाठी २ तास वाट पाहावी लागते. जनावरांचे प्रश्न प्यायला पाणी नसल्याने दूध व्यवसायावर परिणाम होत आहे. प्रशासनाकडे मागणी एवढीच अपेक्षा ग्रामस्थांनी तातडीने टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा व कार्यान्वित करावी, अशी मागणी ग्रामपंचायतला केली आहे. गावातील महिलां म्हणाल्या, ''सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत फक्त पाण्याचा विचार. स्वयंपाक, धुणे, जनावरं सगळं रखडलंय उन्हाळा संपत आला तरी पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे तरी लवकरात लवकर सिंदखेड ग्रामपंचायत ने पाणीपुरवठा पुर्वपदावर आणुन प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांच्याकडून मोफत पाणीपुरवठा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असताना टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांनी शहरात मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. या उपक्रमामुळे शहरातील अनेक भागांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, इतर लोकप्रतिनिधींनीही असा पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही राकेश जाधव यांनी बीड शहरात मोफत पाणीपुरवठ्याचे नियोजन केले आहे. पेठ बीड भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. उन्हाळ्याच्या तीव्र झळा आणि वाढती पाणीटंचाई यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असताना मोफत टँकर सेवा सुरू झाल्याने अनेकांना मोठा दिलासा मिळाला आहे.




सध्या बीड नगरपरिषदेकडून काही भागांमध्ये १५ ते २० दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करताना दिसत आहेत तर काही ठिकाणी विकत पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील घेतले जात आहे अशा परिस्थितीत पेड बीडसह शहरातील ज्या भागांतून मागणी येईल, त्या भागात मोफत पाणीपुरवठा करण्याचा निर्णय राकेश जाधव यांनी घेतला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत असून, समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

राकेश जाधव हे यापूर्वीही विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आले आहेत. गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व बॅग वाटप, होतकरू महिलांना शिलाई मशीन तसेच दिव्यांगांना सायकलींचे वितरण अशा उपक्रमांमुळे त्यांनी शहरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. मोफत पाणी पुरवठामुळे राकेश जाधव यांची सर्व स्तरातून कौतुक होत असून नागरिकांनी आभार व्यक्त केले. दरम्यान, शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर युवा नेते, नगरसेवक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनीही आपल्या प्रभागात मोफत पाणीपुरवठा योजना सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. यामुळे पाण्यासाठी होणारी भटकंती काही प्रमाणात कमी होऊन नागरिकांना मोठा आधार मिळू शकतो.

# बालसंगोपन योजनेचे अनुदान रखडल्याने 'लाडके भाचे' आर्थिक संकटात

## दीड ते दोन वर्षांपासून लाभार्थी प्रतीक्षेत; शिक्षण, पोषण आणि दैनंदिन गरजांवर परिणाम

बीड । प्रतिनिधी

राज्यातील अनाथ, निराधार, एकल पालकांच्या तसेच अत्यंत गरजू मुलांच्या संगोपनासाठी महत्त्वाची मानली जाणारी 'सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' सध्या निधीअभावी रखडल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. अनेक लाभार्थ्यांना गेल्या दीड ते दोन वर्षांपासून मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष खात्यात अनुदान जमा झाले नसल्याने संबंधित कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे पालकांमध्ये संतापाची भावना वाढत असून शासनाने तातडीने प्रश्न सोडवावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

बालसंगोपन योजनेअंतर्गत पात्र मुलांना दरमहा २ हजार २५० रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ विशेषतः अनाथ, निराधार, एकल पालकांच्या मुलांना तसेच अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या कुटुंबांतील मुलांना दिला जातो. या निधीतून मुलांचे शिक्षण, वह्या-पुस्तके, शाळेची फी, कपडे, औषधोपचार आणि पोषण आहाराचा खर्च भागविला जातो. मात्र गेल्या काही महिन्यांपासून नव्हे तर अनेक ठिकाणी दोन वर्षांपर्यंत अनुदान न मिळाल्याने लाभार्थी कुटुंबे अडचणीत सापडली आहेत.



बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक पालकांनी महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयात वारंवार हेलपाटे मारले आहेत. त्यावेळी पालकांना ''योजना मंजूर झाली आहे'', ''निधी उपलब्ध झाल्यानंतर खात्यात रक्कम जमा होईल'', अशी उत्तरे दिली जात असली तरी प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा होत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे अनेक पालकांचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत असल्याचे दिसून येत आहे.

शिक्षण आणि पोषणाचा प्रश्न गंभीर

बालसंगोपन योजनेतील आर्थिक मदत ही अनेक गरीब कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत होती. या मदतीतून मुलांचे शिक्षण सुरू ठेवणे, शालेय साहित्य खरेदी करणे आणि पोषणाचा खर्च भागविणे शक्य होत होते. मात्र अनुदान रखडल्याने अनेक पालकांना मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढावे लागत असून काही ठिकाणी शाळेची फी भरणेही कठीण झाले आहे. पोषण आहारावरही परिणाम होत असल्याने बालकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

'लाडकी बहीण'ला निधी; 'लाडके भाचे' प्रतीक्षेत

राज्यात महिलांसाठी ▶▶ पान २ वर...

# ग्रँड मास्टरच्या दिशेने वाटचाल करणारा बुद्धिबळपटू सोहम लांगोरे याचा आज वाढदिवस





बीड । प्रतिनिधी

बुद्धीच्या पटावर आपल्या अचूक चालींनी विरोधकांना मात देत आणि बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा आंतरराष्ट्रीय फिडे () मानांकनधारक बुद्धिबळपटू सोहम अतुल लांगोरे याचा आज वाढदिवस.चंपावती विद्यालयात इयत्ता दहावीत तो शिक्षण घेत आहे.१६४९ आंतरराष्ट्रीय रेटिंग गुणांसह सोहम सध्या बुद्धिबळातील सर्वोच्च आणि अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या 'ग्रँड मास्टर' ( ) या किताबाच्या दिशेने अत्यंत आत्मविश्वासाने आणि वेगाने वाटचाल करत आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त क्रीडा क्षेत्रातून आणि संपूर्ण जिल्ह्यातून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सोहमचा बुद्धिबळातील प्रवास हा अत्यंत कष्टाचा आणि यशाने वैभवीत झालेला आहे. महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे चेस स्पर्धांमध्ये त्याने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली आहे. अहिल्यानगर,सांगली,पुणे, छत्रपती संभाजीनगर,नाशिक,पाथर्डी, धाराशिव, येडशी, श्रीरामपूर, आळंदी, ▶▶ पान २ वर...